# नियमीत दिवाणी दावा नं.३१७/२०२४ मधील नि. १७ खालील आदेश

(लवकेश भुसनर वि.नाना भुसनर व इतर)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादी क्र.१ हे ऊसतोडीसाठी परगावी गेलेले होते. त्यामुळे वेळेत न्यायालयात येऊन कैफियत व म्हणणे दिले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियत म्हणणेचा आदेश केलेला आहे. प्रतिवादींनी अर्जासोबत दिलेली कैफियत स्विकारण्यात यावी. अन्यथा प्रतिवादी क्र. १ यांचेवर अन्याय होणार आहे. सबब, वरील कारणास्तव प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द केलेला विनाकैफियत म्हणणेचा आदेश सेट असाईड होऊन म्हणणे व कैफियत स्विकारण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, प्रतिवादीने जाणीवपूर्वक कैफियत/म्हणणे देणेस उशीर केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा, अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी

मुदतीत कैफियत दिली नसल्याचे दिसून येते. सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे. प्रतिवादींनी दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तरी सदरचा दावा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.१८ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१७ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.क्र.१५ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

KANCHAN BABASAHEB SONAWANE
Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE
Date: 2025.04.19 11:30:29 +0530

( **के. बी. सोनवणे** )

दि. ०७/०४/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :–

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | :– | Smt. S.S.Kolekar |
| **(b)** | Court | :– | Smt. K.B.Sonawane Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | :– | 07.04.2025 |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | :– | 07.04.2025 |